# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – ४११ ०१८,

## अग्निशामक विभाग,

**मानधन तत्वावर ६ महिने मुदतीसाठी करार पध्दतीने तांत्रिक कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

जाहीरात क्रमांक ११२४/२०१८ दि. ०७/०२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी अग्निशामक विभागाकरिता खालील प्रमाणे तांत्रिक कर्मचारी करार पध्दतीने ६ महिने मुदतीसाठी मानधन तत्वावर नियुक्त करावयाचे आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | पदनांम | पात्रता / अर्हता | पद संख्या | वय मर्यादा | आरक्षित पदे संख्या | एकवट मासिक वेतन र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ट अभियंता (ऑटोमोबाईल) | १) शासनमान्य ऑटोमोबाईल अथवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदविका (डिप्लोमा)<br>२) PMPML / शासकिय / निमशासकिय/ परिवहन/ अग्निशमन संस्थाकडील सदर कामकाजाचा किमान २ वर्षाचा अनुभव.<br>३)जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०१ | कमाल ४० वर्षे | एकाकी पद आरक्षण लागु नाही | २०,०००/- |
| २ | मोटार मेकॅनिक | १) माध्यमिक शालांत (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>२) शासनमान्य ITI मोटार मेकॅनिक पाठ्यक्रम उत्तीर्ण.<br>३)PMPML / शासकिय / निमशासकिय / परिवहन संस्थाकडील सदर पदाचा किमान १ वर्षाचा अनुभव.<br>३) जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०३ | कमाल ४० वर्षे | अनु. जाती. – ०१<br>खुला – ०२ | १५,०००/- |
| ३ | पंप मेकॅनिक | १) माध्यमिक शालांत (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>२) शासनमान्य ITI कडील पंप मेकॅनिक पाठ्यक्रम उत्तीर्ण .<br>३) शासन/ शासन अंगिकृत शासन मान्य संस्थेकडील फायर फायटिंग पंप्स व पीटीओ दुरूस्तीचा किमान २ वर्षांचा अनुभव<br>४) जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०२ | कमाल ४० वर्षे | अनु. जाती – ०१<br>खुला - ०१ | १५,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) करारपध्दतीने नेमलेल्या कर्मचा-यांची नेमणुक ही फक्त ६ महीने मुदतीची असेल. त्यामूळे अर्जदारास कायमपदी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही अथवा या संदर्भात न्यायालयात दाद मागता येणार नाही. याबाबतचे र.रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर हमीपत्र रुजू होते वेळी सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यवसायीक अर्हता विषयक प्रमाणपत्र, जातीचा दाखला, अनुभव, इत्यादी कागदपत्रांच्या **स्वसांक्षांकित सत्यप्रती** जोडणे आवश्यक आहे.

३) ज्या दिवशी अग्निशामक विभांगास सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीसी शिवाय, सदर उमेदवारांची सेवा थेट संपुष्टात आणण्यात येईल. या संबधीची सर्व अधिकार अग्निशामक विभागाने राखुन ठेवले आहे.

४) पात्र उमेदवारांना नेमणुक देतांना पद संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार अग्निशामक विभागांस राहील.

५) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात, पदांसाठी अर्ज, मा. मुख्य अग्निशामक अधिकारी, जनरल अरुणकुमार वैद्य मुख्य अग्निशामक केंद्र, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८ या नावाने करावा. सदर अर्ज **दिनांक २३/०२/२०१८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत** वरील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने किंवा समक्ष पोहचतील अशा बेताने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावेत.

६) निवड झालेल्या उमेदवारांस एकवट मानधना व्यतीरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही.

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाले असे नाही.निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार हा, पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास. त्याची उमेदवारी / निवड रदृबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यासही कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

८) ज्या पदाकरिता अर्ज केलेला आहे. **त्या पदाचे नाव पाकीटावर ठळक अक्षरात लिहावे**.

९) दिलेल्या मुदतीनंतर समक्ष अर्ज घेतले जाणार नाहीत अथवा पोस्टाने उशीरा प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थीतीत केला जाणार नाही.

१०) पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा उशिरा प्राप्त झाल्यस विलंब झाल्यास, त्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहीत नमुन्यात नसलेला, अपुर्ण, स्पष्ट न दिसणारे झेरॉक्स, चुकीचे कागदपत्रे जोडलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

११) उमेदवार निवडीसाठी कोणताही दबाव आणल्यास सदर उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

१२) अर्जदाराने आपले अर्ज महापालीकेने जाहीरातीमध्ये विहीत केलेल्या अर्जाप्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१३) अपूर्ण माहीती अथवा अटींची पुर्तता न करणा-या उमेदवारांचे अर्ज बाद करुन अपात्र ठरविले जातील.अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील, त्याबाबत कोणतेही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४) उमेदवारांना स्वखर्चाने अग्निशामक दलाचा गणवेश शिवून घ्यावा लागेल तसेच सेफटी बुट ई. परिधान करावे लागतील. विभागाकडून कोणत्याही प्रकारचा गणवेश ई. साहित्य् उपलब्ध् होणार नाही.

१५) आग, पुर, भुकंप ई. आपत्कालीन परिस्थीतीत जोखमीचे व धाडसाचे काम करावे लागणार असल्याने त्याचा कोणताही अतिरीक्त मोबदला अथवा विमा ई. सुरक्षा उपलब्ध् होणार नाही. सदर जोखमीचे काम, स्वजबाबदारीवर करावयाचे असून त्याबाबतचे हमीपत्र नियुक्तीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.

१६) मनपा सेवेत असताना उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरापाई करुन घेणेत येईल.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानरगपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. पद भरतीची प्रक्रीया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अंतिम निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राहील.

सही/-
मुख्य अग्निशामक अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

सही/-
अतिरीक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

<u>**अर्जाचा नमुना**</u>

पासपोर्ट साईज
फोटो

**प्रति,**
**मा.मुख्य अग्निशामक अधिकारी,**
**जनरल अरुणकुमार वैदय मुख्य अग्निशमन केंद्र,**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८.**

<u>**विषय :- मोटार मेकॅनिक / पंप मेकॅनिक / कनिष्ट अभियंता पदी मानधनावर नेमणुकीबाबत**</u>.

महोदय,

संदर्भीय दिनांक / २ /२०१८ जाहीरातीनुसार मी (संपुर्ण नांव) ------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------ या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन, या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडीलांचे/पतीचे नाव

१.संपुर्ण नाव ----------------------------------------------------------------------------
२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ------------------------------------------------------------------------
(पिनकोडसह) ----------------------------------------------------------------------------
३.दुरध्वनी/मोबाईल क्र. ----------------------------------------------------------------------------
४.जन्मतारीख दि. / / (अक्षरी-----------------------------------------)
५.लिंग स्त्री/पुरुष
६.जात ------------------------------------- प्रवर्ग - -------------------------------
७.जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक ---------------------------------------------------------
८.अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठ/ संस्थंचे नांव | उर्तीण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

९. जड वाहन परवाना :क्र. ................................... कालावधी दिनांक ................................

१०.अनुभव -

| क्र. | संस्थेचे नांव | पदनाम | कामकाजाचे स्वरुप | अनुभव कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असुन त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन् आल्यास तया माहितीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही व नाव

सहपत्रे :